# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. २४ // स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : २०/१२/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. २०/१२/२०१९ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा.ॲड. हाडा शुचिता अतुलसिंह सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| श्री. ढेकळे सदाशिव गणपत | श्री. पाटील राजेंद्र झिपरु |
| श्री.पोकळे दिलीप बबनराव | सौ.देशमुख प्रतिभा गजानन |
| श्री. खडके सुनिल वामनराव | सौ.काळे रेश्मा कुंदन |
| श्री. कोल्हे प्रविण रामदास | श्री.लढढा नितीन बालमुकुंद |
| श्री. सोनवणे मुंकुदा भागवत | श्री.बरडे नितीन मनोहर |
| श्री. दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | |

सदर सभेस, मा.आयुक्त ,श्री. डॉ.उदय टेकाळे , उपायुक्त. श्री. मिनीनाथ दंडवते, उपायुक्त. श्री. अजित मुठे, मुख्यलेखा परिक्षक श्री.संतोष वाहुळे, मुख्यलेखाधिकारी, कपील पवार, नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली**

**नगरसचिव :- विषय क्र. १.** दिनांक ०६/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**सौ. प्रतिभा देशमुख :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे.

**श्री. दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.०६/१२/२०१९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सौ.देशमुख प्रतिभा गजानन**

**अनुमोदक :- श्री.पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** स्थायी समिती ठराव क्रं.१९३ दि.०६/१२/२०१९ अन्वये तहकूब विषय:**-** प्रभाग समिती क्रं.०३ मधिल मालमत्ता कर वसुली झोन क्रं.४ कार्यसनातील मिळकतधारक तसलीम खान लतीफ खान यांचे कडेस असलेली रक्कम रु. २१३६०/- व श्री.वसंत रामु नाईक (सुनिल वसंत वंजारी) रा.मेहरुण यांचे कडेस असलेली रक्कम रु.८९६०/- मात्र पाणीपट्टीची रक्कम निर्लेखीत करणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** प्रभाग अधिकारी यांनी प्रस्तावासोबत डॉक्युमेंट मध्ये समाधानकारक कागदपत्रे जोडलेले नसल्यामुळे सदरचा विषय आजही तहकुब ठेवण्यात यावा . आणि त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरच हा विषय सभेपुढे आणावा.

**श्री. दिलीप पोकळे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाने प्रस्तावित केलेला हा विषय मागच्या सभेने तहकुब केलेला होता. म्हणजे निर्लेखित करणेबाबतचा स्पष्ट प्रस्ताव आहे. की जाऊन ईन्सपेक्शन केलेले आहे तिथे एकचं नळ आहे. मागच्या सभेतही हा प्रस्ताव तहकुब करण्यात आलेला होता. मग ईतका मोठा विषय काय आहे की तो वांरवांर तहकुब करावा लागतोय. किंवा याच्यासंदर्भात तुमचा आक्षेप काय असेल.तो आक्षेप तुम्ही सभागृहासमोर ठेवावा असा की प्रशासनाने मी मागीतलेली माहिती मला मिळालेली नाही. म्हणजे आठ दिवसांत मिटींगमध्ये प्रस्ताव तहकुब होतात . आणि स्पष्ट असा प्रस्ताव प्रशासनाने दिलेला आहे. तर नेमकं आहे काय या विषयामध्ये असं की प्रस्ताव चुकीचा आहे की निर्लेखित करण्याचा प्रस्ताव चुकीचा आहे. या संदर्भात खुलासा करायला पाहीजे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** आता याच्यात असे आहे की , मागच्या महिन्यामध्ये २०१९ ला अर्ज आलेला आहे. आणि संबंधित कर्मचाऱ्यांना मागच्या सभेत विचारणा केली असता , त्यांनी सांगीतले की , त्यांनी वारंवार आपल्याकडे अर्ज केलेले आहेत. आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांना पाणीपट्टीची आकारणीची बिलं दिलीत . त्यांची हरकत समजा हा विषय २०१६ पासुनचा पेंडींग आहे. आणि दुसऱ्याचा २०१२ पासुनचा पेंडींग आहे. तर त्यांनी याच्या आधी आपल्याकडे कधी अर्ज

केलेलाच नाही .मग २०१९ ला आपण कसे काय म्हणता की त्यांच्याकडे दोन कनेक्शन नव्हते. त्यांनी प्रत्येक वेळेस बिलं स्विकारलेले आहे असे निदर्शनास येत आहे. आणि काम्हणुन आपण त्यांना हे माफ करण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो तर मग प्रशासनाने तसा खुलासा करायला पाहीजे ना ? नेमकं याच्यामध्ये प्रशासनाची जी चुक आहे किंवा तो प्रस्ताव चुकीच्या पध्दतीने दिला आहे.

**मा.सभापती :-** मागच्या मिटींगमध्ये त्यांनी तशी मागणीही केली होती पण प्रशासन अजुनही त्यांच उत्तर समाधानकारक देवु शकलेले नाही, आणि म्हणुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे ताई की जर उत्तर दिलेले नाही तर पुनश्च तो प्रस्ताव या सभेमध्ये यायला नको पाहीजे होता .जो पर्यंत वस्तुस्थितीचं समाधान करण्यात येत नाही. तर प्रस्ताव आणायचा तो पुन्हा तहकुब करायचा याला काही अर्थ नाही ही कुठली कार्यपध्दती आहे हेचं कळत नाही .

**श्री. राजेंद्र पाटील :-** त्यांनी प्रस्ताव पुर्ण न केल्यामुळे मी तशीच मागणी केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाहीतर रद्द करा, मग तशी सुचना मांडा की रद्द करण्यात यावा.

**मा.आयुक्त सो :-** होय तशी सुचना मांडा रद्द करण्याची तुम्ही रद्द करा आम्ही वसुल करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तशी सुचना करा राजुभाऊ की रद्द करा.

**श्री. राजेंद्र पाटील :-** कुठल्याही नागरीकांवर अन्याय होवु नये असे आमचं सर्वांचं मत आहे.

**मा.आयुक्त सो :-** जर त्यांनी कागदपत्रांची पुर्तता केली नसेल तर अन्याय कसा होईल.

**श्री. राजेंद्र पाटील :-** त्यांनी जी कागदपत्रं जोडलेली आहेत ती समाधानकारक नसल्यामुळे

**श्री.नितीन लढ्ढा :-** साहेब हा क्षुल्लक राजकारणाचा भाग आहे. सन्मा.सदस्य श्री. प्रशांत नाईक यांचा मला आता सभेला येण्यापुर्वी फोन आला होता. की हा पाठपुरावा प्रशासनाकडे त्यांनी केलेला होता आणि सन्मा.सदस्य राजुभाऊ पाटील हे संबंधित मिळकतधारकांकडे गेले आणि म्हणाले की अहो मग तुम्ही हा प्रस्ताव मला का नाही सांगीतला .माझ्यामार्फत पाठवायला पाहीजे होता.हे कुठलं ईतक राजकारण आहे ईतक घाणेरडं.

**मा.सभापती :-** तसं काहीही नाही

**श्री.नितीन लढ्ढा :-** मागणी चुकीची असेल तर निर्लेखित करा ना आणि आपल्याला विचारले की आपण काय म्हणता की अन्याय होवु नये म्हणुन आमची ही भुमिका आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** आपण सभागृहाची दिशाभुल करतं आहातं आपण ज्येष्ठ आहात आपण महापौर राहुन चुकले आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दिशाभुल करत नाहीये दिशाभुल आपण करताहेत या सभागृहाची आपल्याला वाटतं नाही तर निर्लेखितचा प्रस्ताव मान्य करा.

**श्री. राजेंद्र पाटील :-** आपण स्वत: कागदपत्र जे आहेत त्याची छाननी करा आणि मग आपण

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो मग आपण गेल्या आठ दिवसांत काय केलं , मागच्या सभेला प्रस्ताव तहकुब झाला .ईतका काही मोठा विषय नाही की , आपण त्याच्यावर आठ दिवस अभ्यास करू शकतं नाहीये.

**श्री. राजेंद्र पाटील :-** आपण स्वत: बघा आणि असं समजु नका , आणि दिशाभुल करू नका संबधित जो माणुस आहे तो माझा नातेवाईक आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना मग म्हणुन हा विषय लांबतो आहे ना.

**श्री. राजेंद्र पाटील :-** सभेची दिशाभुल करू नका .

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो तो तुमच्याच समाजाचा आहे , आणि आमचा सदस्य सुध्दा तुमच्याच समाजाचा आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** पर्सनली घेवु नका

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई काय आहे अशा पध्दतीचे राजकारण करू नका.

**श्री. राजेंद्र पाटील :-** तुम्ही त्याच्यामध्ये गैरसमज पसरवु नका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही गैरसमज नाही, हि अत्यंत वस्तुस्थिती आहे आपल्या डोळयासमोर जर प्रस्ताव चुकीचा असेल तर निर्लेखनाची जी मागणी आहे ती रद्द करण्यात यावी.

**श्री. राजेंद्र पाटील :-** तशी मागणी केलेली नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही सभागृहापुढे आहे ना . हा सभागृहाचा अधिकार आहे की ती मागणी चुकीची आलेली आहे , ज्या पध्दतीने सदस्य शंका उपस्थित करता आहेत. मग काय करायचं आहे प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करा. परंतु आम्हाला मान्यही करायचा नाही , आम्हाला अमान्यही करायचा नाहीये आम्हाला तो फक्त तहकुब तहकुब चालु द्यायचा आहे.

**श्री. राजेंद्र पाटील :-** तहकुब करण्याचा विषय नाही कागदपत्रांची पुर्तता करा आम्ही मान्य करणार , कागदपत्र समाधानकारक नसेल तर कसे मान्य करायचे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मग तुम्ही अमान्य करुन टाका .

**श्री. राजेंद्र पाटील :-** मान्य करतांना आम्हाला समाधानकारक कागदपत्र हवी आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अमान्य करुन टाका .

**श्री.सदाशिव ढेकळे :-** हा जो विषय आहे हा अटी व शर्ती मध्ये मान्य करून घ्या व आत्ताचं ते निपटवां , संबंधित जे आहेत याची चौकशी करा परत दोनदा चौकशी करा निर्लेखित करायची की नाही अशी चौकशी करा आणि पुढच्या मिटींगमध्ये सादर करा.

**श्री.नितीन बरडे :-** अधिकाऱ्यांना दिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो दिले आहेत ना.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** अहो अधिकाऱ्यांच एक उदाहरण देतो मी एका जणाने मला त्याची पाणीपट्टीची पावती मला दाखवली आणि घरपट्टी च्या बिलामध्ये सुध्दा पाणीपट्टीचं बिल लागुन आलेले आहे. ते मी झेरॉक्स मागवली दिले व एस.एस.पाटील यांना फोन केला, एस.एस.पाटील आहेत का आज ते अधिकारीही नाहीत . मी त्यांना सांगीतले की हा काय प्रकार आहे . यांनी पाणीपट्टी भरलेली आहे आणि त्याला परत लावुन आली तर ते म्हणाले की साहेब मी करून देतो . त्यांनी ती खात्री करून घेतली व कमी करून दिली असे होते , एखादेवेळेस असं होत आमचे राजु भाऊ घुगेंच्या निदर्शनास आले असेल म्हणुन काही हा विषय ते लावुन धरत आहे. याच्यामध्ये राजकारण नाहीये .

**श्री.नितीन लढ्ढा :-** मी जे काही बोलतोय ते जबाबदारीने बोलतोय, मी काही विषयाचा प्रस्ताव अत्यंत स्पष्ट असा आहे की हा प्रस्ताव प्रशासन घेत असत. मागच्या मिटींगला तहकुब झाला मी मान्य करु शकतो. एखाद्या वेळेस सदस्यांना काही शंका असेल आणि शंकेच निराकरण करुन घ्यायच असेल. परंतु गेल्या ८ दिवसामध्ये शंकेच निरसण न करता परत त्या प्रस्तावाला त्याच कारणास्तव तहकुब ठेवणे, काही अर्थच नाही या गोष्टीला. जर खरच तुम्हाला वाटत असेल की, कुठेतरी पाणी मुरत आहे. कुठेतरी चुकीचा प्रस्ताव पाठवत असेल तर तुम्ही निर्लेखित करणेचा प्रस्ताव जो दिला प्रशासनाने तो अमान्य करावा. आमच तेही म्हणण आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- एक नंबरचा जो विषय आहे. सन २०११-१२ ते सन २०१९-२० वर्ष किती होतात बघा. इतके दिवस त्यांनी बिल स्विकारल कस. तुम्ही कृपया वसंत रामु चा विषय आणु नका मध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्हाला शंका असेल तर रद्द करा प्रस्ताव.

**श्री.राजेंद्र पाटील** :- तस्लीम खॉ रसुल खॉ यांचा जो विषय आहे. सन २०११-१२ ते सन २०१९-२० यांना तुम्ही किती वर्ष बिले दिली. कोणत्या वर्षी त्यांनी हरकत घेतली. कोणत्याही वर्षी हरकत घेतलेली आहे त्याचा पुरावा सादर करा आणि करा माफ त्यांना. पुरावा सादर करा. विषय वरच्याच बोलत आहे मी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय वरच्याचं असेल खालच्याच असेल बरोबर वाटत असेल तर करा नाही तर रद्द करा प्रस्ताव.

**श्री.राजेंद्र पाटील** :- सन २०११ पासुन त्याच्याकडुन घरपट्टी घेणे बाकी आहे अर्ज केव्हा आलेला आहे तुमच्याकडे माफीचा.

**श्री. चंद्रकांत पंधारे** :- अर्ज आता आलेला आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- सन इतके वर्ष काय केल त्या मालकाने, आमच्यावर आरोप करत असाल तर तुम्ही सिध्द करा. करुन द्या सिध्द तुम्ही. सन २०११ पासुन त्यांचा अर्ज दाखवा मला.आणि कोणत्या बेसवर तुम्ही माफ करत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमच्याकडे अधिकार आहे. नाही तर प्रस्ताव रद्द करा.

**श्री.राजेंद्र पाटील** :- कशासाठी तुम्ही उचलुन धरता विषय, आम्हाला शंका येते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब ठेवण्यामागे हेतु काय हे तर सिध्द करा. आणि तुम्हाला वाटत असेल चुकीचे आहे. तर पुन्हा नव्याने प्रस्ताव आणा.

**श्री.राजेंद्र पाटील** :- दाखवा मला सन २०११-१२ पासुन अर्ज दाखवा.

**श्री. चंद्रकांत पंधारे** :- त्यांचे अर्ज नाही.

**श्री.राजेंद्र पाटील** :- अर्ज नाही तर कसे माफ करता तुम्ही. ज्या दिवसापासुन अर्ज आलेला आहे त्या दिवसापासुन माफ करता येईल. मागच कस माफ करता येईल.

**श्री. चंद्रकांत पंधारे** :- नागरीक वेळोवेळी आपल्या कार्यालयात येऊन गेलेला आहे. आपल्या इंजिनिअरने वेरिफिकेशन केलेल आहे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- इतके दिवस बिल कस घेतल त्यांनी.

**श्री. चंद्रकांत पंधारे** :- बिल तर ठेवाव लागेल ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जो पर्यंत निर्लेखित होत नाही. बिल तर रेज करेल महापालिका. अमान्य करा ना प्रस्ताव.

**श्री.नितीन बरडे :-** अमान्य करा ना अमान्य करा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव हा अपूर्ण व अर्जदार यांनी तक्रार केलेवर सादर केलेला आहे. सदर प्रस्तावा सोबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी अर्जदार यांची कागदपत्र सोबत जोडलेली नसल्याने सदरचा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.राजेंद्र झिपरु पाटील**

**अनुमोदक :- श्री.ढेकळे सदाशिव गणपत**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागाकडिल दि.३०/१०/२०१९ ते दि.०२/११/२०१९, दि.०४/११/२०१९ ते दि.०८/११/२०१९, दि.११/११/२०१९ ते दि.१६/११/२०१९, दि.२५/११/२०१९ ते दि.३०/११/२०१९, दि.०२/१२/२०१९ ते दि.०७/१२/२०१९ व दि.०९/१२/२०१९ ते दि.१३/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** खर्चात दाखविलेल आहे. महिला मेळावा याच रु.२ लाख खर्च आहे. केव्हा झाला आणि कसा झाला.

**श्री.संतोष वाहुळे, मुलेप :-** महिलांसाठी बचत गटाचा मेळावा आपण केलेला होता. आपण पब्लिकेशन मार्फत तो मेळावा झालेल होत.त्याची बिल त्यांनी काढली होती. सागर महाजन म्हणुन जी व्यक्ती आहे ते हे सर्व काम पाहत होते. त्यांचे देयकासाठी त्यांनी न्यायालयात जाणेच पत्र दिलेल होत. त्यामुळे महिला मेळाव्याची जी रक्कम आहे ती आपण त्यांना दोन पार्ट मध्ये पेमेंट दिलेली आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसर एक विषय असा आहे. पथदिवे खर्च ८,८७,०००/- तो केव्हा झाला आणि कसा झाला.

**श्री.संतोष वाहुळे, मुलेप :-** रु.११,३७,४४०/- हे पथदिवे दुरुस्तीच मागच देयक आहे सन २०११ त्याची अदायगी केलेली आहे.

**श्री. नितीन लढढा :-** आरोग्य विभागात घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने सर आपण दोन जे.सी.बी. घेतले होते. जे.सी.बी. अत्यंत लेटेस्ट आहे. जानेवारी २०१९ चे मॉडल आहे. आज दोघेही जे.सी.बी. नादुरुस्त आहे. आता गेल्या १०-१२ दिवसापासुन दोन्ही जे.सी.बी. उभे आहे. आता त्याच्या संदर्भात मी माहिती घेतली. त्याच्यात बेसिक टेक्नीकल प्रॉब्लम आहे. टायर आणि जिस्ट हे कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर हे निदर्शनास आल की तो कंपनी फॉल्टच आहे. टायर ही लवकर जातात आणि जिस्ट जी आहे ती ही लवकर निकामी होते. आणि हेड्रोलिक जे हॉर्सपाईप आहे. तो हेड्रोलिक हॉर्सपाईप ही निकामी होतो. कंपनी आहे अहमदाबादची आणि आपण Gem Portal वरुन परचेस केले होते. अश्या अनुषंगाने आता कंपनीशी करसपॉडंस केलेला आहे परंतु कंपनी काही रिस्पॉंस करत नाही. आणि दोघही घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने महत्वाची वाहने आहे. तर ती तातडीने दुरुस्त व्हावी. आणि दुसर वाहन व्यवस्था विभाग याची जर माहिती घेतली सर तर वाहन विभाग प्रमुख म्हणुन श्री.एस.एस. पाटील जबाबदारी पाहत आहे. श्री.एस.एस. पाटील एक इलेक्ट्रीकल इंजिनिअर आहे आणि इतर जे अधिकारी आहे जे मेकॅनिकल इंजिनिअर आहे त्यांची नेमणुक बघा, समाधान बारी म्हणुन ऑटोमोबाईल इंजिनिअर आहे. परंतु त्यांची नेमणुक कुठे आहे तर अर्थ विभागात, दुसर पंकज पाटील म्हणुन बी.ई. मेकॅनिकल आहे त्यांची नेमणुक कुठे आहे. पाणी पुरवठा विभागात, तिसर निखील खडके म्हणुन मेकॅनिकल इंजिनिअर आहे त्यांची नेमणुक ही पाणीपुरवठा विभागात आहे. मिलींद चौधरी म्हणुन मेकॅनिकल इंजिनिअर आहे त्याची नेमणुक आहे आरोग्य विभागात, म्हणजे ज्या गोष्टीसाठी जो व्यक्ती प्रशिक्षीत तज्ञ अभियंता आहे. म्हणजे न्हाव्याच काम धोब्याला दिलेल आहे आणि धोब्याच काम न्हाव्याला दिलेल आहे. असली परिस्थिती आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** जे टेकनिकल लोक आहे त्यांना द्या.

**मा.आयुक्त :-** मी स्वत: सुचना दिली होती. जे टेकनिकल लोक आहे ते द्या, तर हेच टिप्पणी टिप्पणीचा खेळ खेळत बसले. टिप्पणी दोन मिनिटात अॅप्रुव होते आणि मिच सांगत आहे. म्हणजे आपली प्रायमरी फोकस कुठेतरी चुकत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे अर्थ विभागाला इंजिनिअरच काम काय हे एक मोठा कोशनमार्क आहे ? योग्य विभागाला योग्य प्रकारे माणस मिळतील.

**मा.आयुक्त :-** ते आपण आजच करुन घेऊ. आज ऑर्डर इशु होतील अस करु. आता आपण त्यांना त्यांच्या कॅलिफिकेशन प्रमाणे घेऊ त्याच पदावर. म्हणजे काही लिपीक आहे मला अस सांगण्यात येत आहे. शिपाई आहेत. तर आपण त्या विभागात करुन घेतो.

**मा.सभापती :-** कॉलिफिकेशनचा विचार करुन जर प्रशासन करु शकतो तर करुन घेऊ.

**श्री.नितीन लढढा :-** म्हणजे ईलेक्ट्रीकल इंजिनिअर हा ईलेक्ट्रीकल मध्ये प्राधान्य आहे.

**मा.सभापती :-** ही सर्व प्रशासकीय बाबी आहे आणि नितीन भाऊंनी जी सुचना मांडली ती योग्य आहे. प्रशासनाने सुचनेची ताबडतोब नोंद घेऊन कार्यवाही करायची आहे.

**श्री.नितीन लढढा :-** ट्रॅक्टर पर्चेस करुन त्याला मोठा कालावधी झालेला आहे. परंतु खुप दिर्घ कालावधीमध्ये सुध्दा त्यांच नियमीत जे मेनटेनंस व्हायला पाहिजे, सर्व्हीसींग व्हायला पाहिजे, ऑईलींग व्हायला पाहिजे. ते सुध्दा झाले नाही. हे का होत. आज एक दोन रुपये खर्च अपेक्षित असेल परंतु ते दुर्लक्षीत केल्यामुळे ते रु.१०० च्या खर्चावर जातो. कारण इंजिन डाऊन होतो, बेरींग जातात.

**मा.आयुक्त :-** पण कस आहे. तिन महिन्याच सर्व्हीसींग असल तर आपण करुन घेऊ. काही विभाग प्रमुख सुध्दा बघत नाही. ऑटोमोबाईल वाले करत नाही.असे जर बघितले तर त्या वाहनांचे जे ड्रायव्हर आहे ही त्यांची जबाबदारी आहे. ती करुन घ्या.

**श्री.नितीन लढढा :-** त्यांनी त्यावेळेला तपासणी करुन जे काही अडचणी असतील ते प्रशासनाच्या निर्दशनास आणायला पाहिजे. मा.सभापती महोदया, मागच्या स्थायी समितीला आयुक्त साहेब नव्हते .फुले मार्केट मधील प्रॉपर्टीचे ओरीएंटल इंन्शुरन्स कंपनी चे गाळे सिल केलेले होते , आणि गाळे सिल केल्यानंतर सदर कंपनीने न्यायालयात धाव घेतली होती आणि त्यानंतर जिल्हा न्यायालयाने सुध्दा त्यांची मागणी फेटाळल्यानंतर ते उच्च न्यायालयामध्ये गेलेले होते त्यावेळेला न्यायालयाने ओरीएंटल इंन्शुरन्स कंपनीला १ कोटी ७० लक्ष रूपये हे न्यायालयात जमा करावे तदनंतरच त्यांच्या गाळयांचे सिल खोलले जाईल .आणि त्या पध्दतीने ओरीएंटल इंन्शुरन्स कंपनीने तिन दिवसांच्या आंत १ कोटी ७० लाख रूपये आता जवळपास दिड वर्षापुर्वी तिथे डिपॉझिट केलेले आहेत.परंतु या रकमेची मागणी करणेसंदर्भात प्रशासनाकडुन कुठलीच पावलं उचलली गेली नाहीत असा मुद्दा मी मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये निदर्शनास आणुन दिला होता. कारण आत आपण आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता १ कोटी ७० लक्ष रूपये ही रक्कम छोटी नाहीये .तर आता त्याच्यामध्ये मागच्या आठवडा भरात काय प्रगती झालेली आहे. विधी शाखेने काही अर्ज केलेले आहेत किंवा नाही या संदर्भात खुलासा करावा .

**मा.सभापती :-** सभापती म्हणुनही व विधी समिती प्रमुख म्हणुनही मी या विषयाची माहिती घेतली होती .त्यामध्ये अशी माहिती समोर आली आहे की जी अमाऊंट त्यांनी भरली होती ती आपण जी जुनी बिलं अदायगी केली होती त्यानुसार त्यांनी भरलेली आहे. आणि नविन बिलं आपण जे बाकीच्या गाळेधारकांना दिलेले आहे त्यानुसार रकमा हया कमी झालेल्या आहेत .तर कोर्टाने अशी ऑर्डर केलेली आहे की , जर तुम्हाला ही अमाऊंट काढायची असेल तर तुम्हाला , प्रशासनाला एक ॲफेडेव्हिट करून द्यावे लागेल . या केसचा जो काही निकाल लागेल त्यावेळेला नविन बिलांनुसार जी नविन रक्कम ठरेल त्यानुसार तेवढी रक्कम तुम्हाला परत करावी लागेल .तर ते ॲफेडेव्हिट केल्यानंतरच पण ते आता पेंडींग आहे .ॲफेडेव्हिट केल्यानंतर आपण काढु शकतो .

**श्री.नितीन लढढा :-** मॅडम आपण स्वत: याचा पाठपुरावा करावा कारण दुर्लक्षित राहातं.

**मा.सभापती :-** आपण दिलेल्या सुचना हया व तो विषय पुढे फॉरवर्ड केला जाईल .

**श्री.नितीन लढढा :-** या विषयांनतर दुसरा एक विषय आपल्याला सांगतो की ट्रान्सपोर्ट नगर म्हणुन शहरात आपल्या मनपाची जागा आहे. गेल्या १२ वर्षापासुन मी त्याचा पाठपुरावा करतोय. १२ वर्षापासुन पाठपुरावा करत असतांना ८१ब च्या सगळया नोटीसी सोपस्कर पार पाडल्यानंतर सदरहु ट्रान्सपोर्ट नगर असोसिएशन हे जिल्हा न्यायालयात गेलेल होत. जिल्हा न्यायालयाने सुध्दा त्यांची बाजु फेटाळली होती. जिल्हा न्यायालयाने बाजु फेटाळल्यानंतर त्यावेळेला आपण प्रशासनाला सुचना केली होती की, याच्या संदर्भात केवेट दाखल करायला पाहिजे औरंगाबाद कोर्टात कारण ट्रान्सपोर्ट नगर असोसिएशन पुन्हा औरंगाबाद न्यायालयात जाईन आणि त्या वेळेला सुचना केल्यानंतर सुध्दा प्रशासनाने त्या संदर्भात दुर्लक्ष केल. दुर्लक्ष केले म्हणजे काय होत की, एक तर निष्काळजीपणा दुसरा की, दुर्लक्ष झाल्याने समोरचा काही वेगळया इन्टेनशनने जाणीवपुवर्क दुर्लक्ष अशी प्रकरणे केली जातात.असा बराच अनुभव आहे. आता त्या ट्रान्सपोर्ट नगरचा निकाल मी आपल्याला दाखवतो रिट पिटीशन नं. ९१९, रिट पिटीशन नं.१२४३८ of २०१८ Jalgaon District motor transport Agent Association, Jalgoan and Respodent Commissioner, Jalgaon City Municipal Corporation, Jalgaon. Here is the Senior Advocate for Pretitioner Shri. Gadkare for Pretitioner submitted that based on notice issued on ३० May २००३ order was passed by thirteen years thereafter on २० may २०१६. The reply was given by the pretitioner १८ June २००३ and britches arised are not significant in HR his file on behalf of Municipal Corporation. आता मला सांगा की, कॅव्हेट सुध्दा त्यावेळेला लावण्यात आली. स्टेटोस्को दिलेला होता या स्टेटोस्कोची मुदत ही २०१८ मध्ये संपुष्टात येऊन गेलेली आहे. आज जवळ पास पाऊणे चार एकर जागा आहे महानगरपालिकेच्या मालकीची तशी जर बघितली तर ती ही शहरातल्या मध्यवर्ती भागात आहे. आपण भुसावळला जातांना हायवे टच ती जागा आहे. साधारणता पाऊणे चार एकर जागेच्या संदर्भातली भुमिका त्या वेळेला साधारणता सन १९८५ साली ही जागा तत्कालीन प्रशासनाने म्हणजे प्रशासक होते त्यावेळेला नगरपालिके वर. आणि १९८५ ला तीन वर्षाच्या लिजने प्रशासकाने ती जागा दिलेली होती. म्हणजे १९८५ ला दिलेली असेल तर १९८८ ला ती लिज संपली असेल. साधारणता १९८८ ते आजपावेतो दोन टर्म पासुन मी स्वत: त्याचा पाठपुरावा करतो. त्याच मागच इन्टेन्शन हे होत सर की जी ट्रान्सपोर्ट नगरची जागा आज पाऊणे चार एकरची जागा आहे. जसा हा टॉवरचा भाग आहे मध्यस्तंभ शहराचा मध्यवर्ती भाग म्हणुन झालेला आहे. तसे मेहरुण, खेडी, जुने जळगांव अश्या संपुर्ण वस्तीला तो एक नवीन सेक्टर तयार झालेला आहे. त्या पाऊणे चार एकर जागेचा व्हेजीटेबल मार्केट म्हणा किंवा कुठलेही मुलभुत सुविधेसाठी त्याचा उपयोग करुन घेता येतो. दुसरा ज्या सर्व लक्झरी बसेस जी आहे शहरात येणाऱ्या वेगवेगळया ठिकाणी उभ्या राहतात. काही आय.एम.आर. जवळ उभे राहतात, काही आदर्श नगरला उभे राहतात, काही स्मशानभुमीच्या बाजुला उभे राहतात. ऐवढया मोठया बसेसचा शहरामध्ये आगमण झाल्यामुळे वाहतुकीची कोंडी होते. त्याचा एक पर्याय आपण हा

ही विचार केलेला होता की, संपुर्ण लक्झरी स्टॅण्ड तेथे उभारल जाव. जेणे करुन हायवे टु हायवे नागपुर कडे जाणारी बसेस, मुंबईला जाणारी बसेस, पुणेकडे जाणारी बसेस यांच शहरामध्ये कुठेही येण्याच प्रयोजन राहणार नाही आणि ते ट्रान्स्पोर्ट नगर होईल या लक्झरी बसेसच्या दृष्टीकोणातुन, जेणे करुन त्यातुन महानगरपालिकेला उत्पन्न ही मिळेल, आणि आपण एक भुसंपादनचा प्रस्ताव साधारणता त्याला ही सुरु करायला जवळपास ७-८ वर्ष होऊन गेलेले आहे. तो आहे खेडीला म्हणजे जेथे आपल टी.व्ही. स्टेशन आहे. टी.व्ही स्टेशनच्या तेथे साधारणता तेथे एक २२-२३ ऐकरचा क्षेत्र भुसंपादनाचा महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर आसोदा शिवारात आहे. त्यावेळेला भुसंपादनाचा संपुर्ण प्रस्ताव तयार करुन कार्यालयापर्यंत पोहचलेल होत. साधारणता त्यावेळेला त्याच ४-५ कोटीच भुसंपादनाचा मोबदला द्यायचा होता. त्यात कुठेतरी पॉलिटीकल इनकप्लायन्स म्हणा किंवा कुठेतरी प्रशासनाच्या आडमुठेपणा मुळे साधारणता जर ते २३ ऐकरच क्षेत्र जर महानगरपालिकेने ताब्यात घेतल तर तेथे अत्याधुनिकपणे ट्रान्सपोर्ट नगर उभारुन त्याच्यातुन सुध्दा रेव्हेनीव जनरेट करुन शहरा मध्ये ही जी ट्रान्सपोर्ट नगरमुळे येणारी वाहतुक आहे.ती परस्पर शहराच्या बाहेर राहील. कारण आता जो बायपास आहे. त्या जागेला लागुनच आहे. हे जे भुसंपादनाच क्षेत्र आहे ट्रान्सपोर्ट नगरचा याच्या मधुन बायपास गेलेला आहे. म्हणजे त्यांना सुध्दा ते सोईच होत. आणि शहराचा वाहतुकीचा तानही त्याच्यामुळे कमी होत. भुसंपादनाच्या विलंबाच्या बाबतीत माहिती जर आपण प्रशासनाला विचारली संबंधीत विभागास की, नेटवर्थ त्या जागेचा भुसंपादन मोबदला किती आहे. आणि त्याला विलंब कुठल्या कारणाने होत आहे. ही कोर्ट मॅटर करण्याचा विचार ही केला, ज्याच्यातुन रेव्हेनीव जनरेट होऊ शकेल कारण कुठेतरी तुम्हाला रेव्हेनीव जनरेट करणेचे सोरसेस शोधावे लागतील. तेव्हाच जी भविष्यातली महानगरपालिका जी आहे ती स्वावलंबी होईल. आपण निव्वळ शासनाच्या मदतीवरती किंवा नागरीकांवर टॅक्स वाढविण्याच्या दृष्टीकोणातुन वारंवार विचार करु शकत नाही कारण त्याला एक मर्यादा आहे. शासनाकडुन मिळणाऱ्या निधीला ही मर्यादा आहे नागरीकांवर टॅक्स बोझा वाढविण्याच्या संदर्भात ही मर्यादा आहे. रेव्हेनीवचे जो पर्यंत आपण नविन नविन स्त्रोत निर्माण करणार नाही. तो पर्यंत ही महानगरपालिका आर्थिक अडचणीतुन बाहेर नाही जाऊ शकत. ह्या दोन गोष्टी आपण पुढच्या स्थायी समिती सभेला, तो भुसंपादनाचा प्रस्ताव आणि ट्रान्सपोर्ट नगरला हायकोर्टाने दिलेले निर्देश, पुढील कार्यवाही जी आहे सन २०१८ पर्यंत हायकोर्टाने थांबविलेली होती. परंतु त्याच्यानंतर आपले महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना वारंवार सुचना करुन सुध्दा त्याच्यात कुठलेही प्रयत्न झालेले नाही. नाही तर आताशी ती जागा खाली होऊन आपल्या ताब्यात आली असती. गोलाणी मार्केटचे हस्तांतरण, नवीन बी.जे. मार्केटचे हस्तांतरण, या दोन्ही मार्केटची मुदती अजुन संपलेल्या नाही. परंतु मोठया प्रमाणावर गाळे हस्तांतरण म्युचवल अंडरस्टॅण्डींग (Mutual Understanding) मध्ये झालेले आहे. सामान्य गाळेधारक जे आहे त्यांची रिजनेबल गाळे हस्तांतरणबाबत जी रक्कम आपण ठरवुन द्याल ती भरण्याची सुध्दा त्यांची तयारी आहे. त्याच्यातुन सुध्दा साधारणता ३ ते ४ कोटीचा रेव्हेनीव जनरेट होऊ शकतो. त्याच्या संदर्भात सुध्दा मागच्या स्थायी मध्ये मी चर्चा केली होती. त्याच धोरण जे आहे ताबडतोब निश्चित करुन एक रिजनेबीलीटी पाहिजे काय होईल की, हस्तांतरण फी ही आपण जास्त ठेवली तर त्याच्या मध्ये तेच होईल लोक म्युचवल अंडरस्टॅण्डींग (Mutual Understanding) मध्येच त्यांचे गाळे हस्तांतरण करतील.पुन्हा जर आपण याच्या संदर्भात चौकशी लावण्याचा प्रयत्न केला.

**मा.आयुक्त :-** आम्ही चेक करतो. त्याच्यात काही तरी निर्णय झाला होता.

**श्री.नितीन लढढा :-** मी सांगतो तुम्हाला त्याच्यात काय निर्णय झाला होता. प्रशासनाने काय केल होत की, त्यावेळेला आकारणी करतांना, समान पध्दतीने ती आकारणी केलेली होती. म्हणजे बेसमेंट मधले गाळयांना सुध्दा अमाऊंट तेवढीच, ग्राऊंड फ्लोअरला ही तेवढीच, फस्ट फ्लोअरला ही तेवढीच आणि सेकंड फ्लोअरला ही तेवढीच, ती कुठेतरी अन्यायकारक वाटत होती आणि ती अन्यायकारक वाटत असल्याने आम्ही रिजनेबीलीटी वाटण्याच्या दृष्टीकोणाने एक धोरणात्मक निर्णय घेतलेला होता. परंतु त्या मागील भुमिका थोडीशी वेगळी आहे. त्या वेळेला श्री.किशोर राजे निंबाळकर जिल्हाधिकारी होते.आणि कोणत्या तरी कारणामुळे गोलाणी मार्केटच्या स्वच्छतेच काम त्यांनी हाती घेतलेल होत.आणि खुप चांगल्या पध्दतीने झाल होत. परंतु काही गाळे धारकांची त्याच्यामध्ये नाराजी होती. आणि किशोरराजे निंबाळकरांनी काय केल. पहिले आपण यांच्याकडुन सेवाशुल्क आकारत होतो. सेवाशुल्क आकारणीला सदरहु मार्केटच्या संघटनेने जिल्हा न्यायालयामध्ये अवाहन केलेल होत. काही दिवसानंतर काय झाल तो निकाल आपल्या विरोधात गेला मनपाच्या. मनपा विरोधात गेल्या मुळे काय झाल ती सेवाशुल्क आकारणी आपल्याला रद्द करावी लागली. निंबाळकर साहेबांनी भुमिका घेतली की, तुम्ही सेवाशुल्कला विरोध करता आणि स्वच्छताची मागणी आमच्याकडे करतात. मार्केटची स्वच्छता करणे ही आमची जबाबदारी नाही, प्रत्येक गाळेधारकाची आहे. तुम्ही कचरा संकलन करुन गाळयांसमोर जी काही ओपनस्पेस असेल तितपर्यंत आणुन टाकण्याची जबाबदारी तुमची आणि तेथुन उचलुन घेण्याची जबाबदारी आमची. मग त्याच्यातला एक पर्याय असा काढला होता की, आपण त्यांना एक एजन्सी नेमुन दिली होती. ही एजन्सीला मासिक खर्च काय लागतो ते तुम्ही स्वत:च ठरवायच, त्याच्या बद्दल एक जॉईंट मिटींग घेतलेली होती जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये, त्याच्या साधारणता रु.४००/- प्रति महिना किंवा रु.२००/- प्रति महिना असोसिएशन आणि जे काही महिला बचतगट होत त्याच्यामध्ये समन्वय करुन तश्या पध्दतीचा निर्णय घेतला होता. परंतु त्यांच्यातुन कोणत्या तरी एका गाळेधारकानी विक्षीप्त टिप्पणी किशोरराजे निंबाळकरांबाबत फेसबुक आणि व्हॉटसअपवर टाकली होती. आणि त्या गोष्टीचा कुठेतरी व्यक्तीगत

राग आल्यानंतर त्या मार्केटच्या संदर्भात घेतलेले निर्णय शासनाकडे विखंडनासाठी पाठवुन दिलेले होते. त्याच्यात वेगळे तसे काही कारण नाही. जो काही नियमानुसार असेल परंतु नियमानुसार करतांना जितकी चौकट आपल्याला वाकवता येईल तितकी चौकट वाकवुन निर्णय घेतला तर ते स्वईच्छेने पैसे भरतील महानगरपालिकेला रेव्हेनीव प्राप्त होईल. त्या संदर्भात जर काही धोरणात्मक निर्णय घ्यायचा असेल तर ते महासभेसमोर आणावा ऐवढीच माझी विनंती आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** नितीन भाऊंनी या ठिकाणी सांगितल की, लक्ष घालायला पाहिजे, मी मागेही सांगितल होत, तलावामध्ये मासे पालनाचा विषय होता. आणि ज्याला आपण दिल होत तीन वर्षासाठी त्याने स्टे लावला, १५ ते २० वर्षापासुन अजुन ते स्टेच काय झाल काही कल्पना नाही. मागच्या वेळेलाही बोललो होतो आता ही बोलत आहे. लक्ष घातल पाहिजे. आपण जर समज दिली त्यांना तर होईल. एकच विषय नाही तलावाचा अनेक विषय आहे. नितीन भाऊंनी या ठिकाणी सांगितल, अनेक गोष्टी जी आहे न्यायप्रविष्ठ गोष्टी, त्या गोष्टींचा पाठपुरावा केला तर महापालिकेचा फायदा होईल. तस आपण करत नाही.

**श्री.किरण भोळे, विधा शाखा प्रमुख :-** त्यांनी दोन तीन दिवसापुर्वी अर्ज केलेला आहे. त्यासाठी ॲफिडेविड करायच आहे. मी दाखवल मॅडमांना.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** एका विषयाला १५-१५, २०-२० वर्ष लागतात कस होईल, विधी शाखा काय करत आहे.

**श्री.नितीन लढढा :-** लोक याच संधीचा फायदा उचलता, हायकोर्टात किंवा कुठल्यातरी खालच्या कोर्टामध्ये स्टे ॲप्लीकेशन करुन ठेवतात. आणि आपले अधिकारी म्हणतात की, न्यायप्रविष्ठ बाब आहे. परंतु एखादी बाब न्यायप्रविष्ट ही असेल. परंतु न्यायप्रविष्ठ असतांना त्याला स्थगिती आहे की नाही. ते सुध्दा ते याच्यावर लिहीत नाही. आणि फक्त न्यायालयाचा धाक उभा केला जातो की प्रकरण न्यायालयीन आहे. वेळोवेळी वेगवेगळया विभागाच्या माध्यमातुन तेथे उत्तरं दाखल करावे लागतात. एखादा सरकारी वकील याच्या संदर्भात स्क्रुटनी करतो की, याच्या संदर्भात ॲफिडेविड करायच आहे.लेखी खुलासा पाहिजे परंतु वर्षानुवर्ष खुलासा सादर होत नाही. आणि या मुळे महानगरपालिकेच्या मालमत्तांच मोठया प्रमाणावर नुकसान होत. मी साहेब तुमच्या समोरही दोन तीनदा हा विषय केलेला आहे. आज पुन्हा करतो, मेहरुण आपली हुडकोची जी जमिन आहे. सदोबा वेअरहाऊसच्या बाजुला लागुन कोट्यावधी रुपयांचा भुसंपादनाचा मोबदला आपण दिलेला आहे. वाढीव मोबदला सुध्दा आपण दोन ते अडीच कोटी आपण दिलेला आहे. परंतु जमिन मालकाच्या ताब्यात अजुन ही जागा आहे. आणि मी सातत्याने दहा वेळा बोलेलो आहे. म्हणजे जमिनीचे कोट्यावधी रुपये आपण एका मिनीटात देतो. परंतु जमिन ताब्यात घेण्याची तजविज प्रशासनाकडुन होत नाही. त्याच्यामध्ये अतिक्रमण होत. मेहरुणच्या जागेची परिस्थिती तुम्ही बघाल सर तर तेथे सगळे गाई म्हशी बांधलेले आहे, चारा भरुन ठेवलेला आहे. आणि काही तरी जागा जमिन मालकाच्या ताब्यात असल्यामुळे तो त्याच काहीतरी कर्मशियल वापर करत आहे. हा विषय कमीत कमी १० वेळा सभागृहात चर्चेला आलेला आहे. प्रशासनाने कमीतकमी भुसंपादनाचा मोबदला अदा केलेनंतर जागेची मोजणी करुन आपली जागा आपल्या ताब्यात घेऊन त्याच्यात खुणा वगैरे काढुन त्या सुरक्षित कसे राहतील. कमीतकमी तिथला ज्युनियर इंजिनिअर असेल त्याच्यावर ती रिस्पॉन्सीबीलीटी फिक्स करायला पाहिजे. या महानगरपालिकेच्या मालमत्ता आहे आणि याच्यावर नियंत्रण ठेवणे तुमची जबाबदारी आहे. त्याच्या बाबतीत सुध्दा गांर्भियाने घेणेची गरज आहे सर.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** जे जे अधिकारी आहे त्यांनी अस समजायच की ही आपली प्रॉपर्टी आहे असे समजुन जर काम केल तर ही वेळ येणार नाही आणि आम्हाला ही बोलण्याची संधी मिळणार नाही.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. २०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागाकडिल दि.३०/१०/२०१९ ते दि.०२/११/२०१९, दि.०४/११/२०१९ ते दि.०८/११/२०१९, दि.११/११/२०१९ ते दि.१६/११/२०१९, दि.२५/११/२०१९ ते दि.३०/११/२०१९, दि.०२/१२/२०१९ ते दि.०७/१२/२०१९ व दि.०९/१२/२०१९ ते दि.१३/१२/२०१९ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी** अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १२** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**अनुमोदक :- श्री.खडके सुनिल वामनराव**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**